आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२४ मार्च २०२६ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- अनुसूचित जाती आणि जमाती दर्जा फक्त हिंदू,  शीख किंवा बौद्ध धर्मीयांनाच मिळू शकेल, असा सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा

- रेल्वे तिकीट रद्द करण्याच्या शुल्कात बदल, ८ तास आधी तिकीट रद्द केलं तर कुठलाही परतावा नाही

- जादा परताव्याचं अमिष दाखवून फसवणूक करण्याच्या प्रकरणांचा निकाल लौकर लागावा याकरता कायद्यात बदल करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

- पश्चिम आशियात सुरू असलेल्या गंभीर परिस्थितीला एकजुटीनं सामोरं जावं लागेल याचा  प्रधानमंत्र्यांचा पुनरुच्चार

**आणि**

- महिला क्रिकेटमधे दक्षिण अफ्रिकेविरुद्धच्या टी-ट्वेंटी मालिकेसाठी भारताचा  संघ जाहीर

**<><><><><>**

हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माची अनुयायी असणारी व्यक्तीच अनुसूचित जाती आणि जमाती दर्जासाठी दावा करू शकेल. ख्रिस्ती धर्मासारख्या इतर कोणत्याही धर्मात धर्मांतर करणाऱ्या व्यक्तिचा अनुसूचित जाती दर्जा रद्द होईल, असं सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. या तीन धर्मांव्यतिरिक्त इतर धर्मांत धर्मांतर केलेली कोणतीही दलित व्यक्ती अनुसूचित जाती आणि जमातींवरच्या अत्याचार प्रतिबंधक कायद्याचं उल्लंघन झाल्याचा दावा करू शकत नाही, असं न्यायालयाने म्हटलं आहे. आंध्र प्रदेशातल्या एका ख्रिस्ती धर्मगुरूने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. त्यावर न्यायमूर्ती पी. के. मिश्रा आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठाने आज हा निवाडा दिला.

**<><><><><>**

भारतीय रेल्वेनं तिकीट रद्द करण्याच्या शुल्कात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रवासाला ८ तास शिल्लक असताना रेल्वेचं तिकिट रद्द केलं तर कुठलाही परतावा मिळणार नाही, अशी माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत दिली.

**होल्ड - रेल्वे मंत्री बाइट**

सध्या ४ तास आधी तिकिट रद्द केलं तर कुठलाही परतावा मिळत नाही. प्रवास सुरू व्हायला ७२ तासापेक्षा कमी वेळ आणि २४ तासापेक्षा जास्त वेळ शिल्लक असेल तर रेल्वेच्या भाड्याच्या २५ टक्के शुल्क आकारले जाईल. सध्या ४८ तासापेक्षा जास्त आणि १२ तासापेक्षा कमी कालावधीत तिकिट रद्द केलं तर २५ टक्के शुल्क कापले जाते. प्रवासाला सुरुवात करायला २४ तासापेक्षा जास्त आणि ८ तासापेक्षा कमी वेळ शिल्लक असेल तर ५० टक्के रद्दीकरण शुल्क आकारले जाईल. सध्या १२ तासापेक्षा कमी आणि ४ तासापेक्षा जास्त वेळ असेल तर ५० टक्के शुल्क आकारले जात होते.

प्रवाशांच्या सुविधेसाठी प्रवास सुरू व्हायच्या अर्धा तास आधीपर्यंत प्रवास सुरू करण्याचे ठिकाण बदलण्याची सुविधा रेल्वेनं उपलब्ध करुन दिली आहे. यापूर्वी चार्ट तयार व्हायच्या आधीच प्रवास सुरू करण्याचे ठिकाण बदलता येत होते.

**<><><><><>**

जादा परताव्याचं अमिष दाखवून फसवणूक केलेल्या प्रकरणांचा निकाल सहा महिन्यात दिला जावा याकरता कायद्यात बदल करण्याचा निर्णय सरकारनं घेतल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासाला सांगितलं. याबाबत हेमंत ओगले यांनी प्रश्न विचारला होता. दिव्यांगाना प्रधानमंत्री आवास योजनेतून दिल्या जाणाऱ्या घरात रॅम्पची व्यवस्था केली जाईल असं

गृहनिर्माणमंत्री अतुल सावे यांनी सांगितलं. विकसित महाराष्ट्र २०४७ धोरणांतर्गत दिव्यांगांना कौशल्य विकास तसंच स्वयंरोजगार प्रशिक्षण दिलं जातं अशी माहिती देत त्यांनी दिव्यांग बीजभांडवल योजनेंतर्गत अर्थसहाय्यात वाढ केली जाईल आणि स्पर्धा परीक्षेसाठीचे शुल्क कमी करण्याचा विचार केला जाईल, अशी ग्वाही दिली.

**<><><><><>**

विधिमंडळाच्या बाहेर घडलेल्या घटनांवर निर्णय किंवा आदेश देण्याचा अधिकार हा सभागृहांच्या पीठासीन अधिकाऱ्यांना नाही, तर कार्यकारी मंडळाला आहे, असं निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत दिलं. सातारा जिल्हा परिषद निवडणुकीच्या वेळी झालेल्या गोंधळाप्रकरणी पोलीस अधीक्षकांच्या निलंबनाचे निर्देश उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी काल दिल्याप्रकरणी ते बोलत होते.

**होल्ड बाईट-फडणवीस**

पीठासीन अधिकारी हे कार्यकारी मंडळाच्या भूमिकेत जाऊ शकत नाहीत, तो अधिकार त्यांना नाही, असं ते म्हणाले. त्यांनी दिलेला निर्देश हा त्यावेळच्या परिस्थितीनुसार असतो. वस्तुस्थिती तशीच असेल, तर कार्यकारी मंडळ त्यावर कारवाई करतं, पण नसेल, तर सत्य परिस्थिती त्यांना कळवण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला आहे, असं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

हाफकिन संस्थेकडे असलेला DPT लस तयार करण्याचा स्टेन ही अत्यंत दुर्मिळ आणि ऐतिहासिक जैव-संपत्ती आहे. याचे बाजारमूल्य शेकडो कोटी रुपये आहे. रिलायन्स लाईफ सायन्सेस या खाजगी कंपनीने प्रस्ताव दिल्यानंतर, कोणतीही विचारणा न करता हाफकिनने लगेच Expression of Interest मागवण्याची प्रक्रिया सुरू केली यावर काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी लक्षवेधी माध्यमातून आक्षेप घेतला. हाफकिन ही संस्था स्वतः लस उत्पादनात

सक्षम असताना, १५०० कोटींचा हा मौल्यवान ठेवा खाजगी कंपनीच्या हातात का दिला जात आहे, असा सवाल विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

**<><><><><>**

बारामती विधानसभा मतदारसंघातली पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी असा राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रयत्न असून त्याकरता विरोधी पक्षांशी चर्चा करु, असं प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सांगितलं. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने उमेदवार न देण्याचा निर्णय घेतल्याबद्दल तटकरे यांनी खासदार सुप्रिया सुळे यांचे आभार मानले. दिवंगत अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्ष उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार येत्या ६ एप्रिलला  उमेदवारी अर्ज भरतील, अशी माहिती तटकरे यांनी दिली.  बारामती आणि राहुरी या दोन मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठी येत्या २३ एप्रिलला मतदान होणार आहे.

**<><><><><>**

पश्चिम आशियात सुरू असलेल्या गंभीर परिस्थितीचे परिणाम दीर्घकाळ राहतील, त्यामुळे आपल्याला अशा परिस्थितीसाठी एकजूट दाखवावी लागेल, याचा पुनरुच्चार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला. पश्चिम आशियातल्या संघर्षावर त्यांनी आज राज्यसभेत निवेदन दिलं, त्यावेळी ते बोलत होते. कोरोना काळात दाखवलेली एकजूट आपल्याला पुन्हा एकदा दाखवावी लागेल, असं आवाहन त्यांनी देशवासियांना केलं. पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे देशासमोर गंभीर उर्जा संकट निर्माण झालं आहे. त्यामुळे संवाद आणि राजनैतिक प्रयत्नांच्या माध्यमातून शांतता प्रस्थापित करणं महत्त्वाचं आहे. भारताने युद्धाच्या सुरुवातीपासूनच संबंधित देशांच्या अध्यक्षांशी संपर्कात राहून शांततेसाठी प्रयत्न केले आहेत, तसंच

व्यावसायिक जहाजं आणि होर्मुझची अडवणूक स्वीकारार्ह नाही, असंही मोदी म्हणाले.

परिस्थितीचा गैरफायदा घेणारे अफवा पसवण्याचा प्रयत्न करतील, मात्र अशांवर विश्वास ठेवू नका, असं आवाहनही मोदींनी केलं. अशा परिस्थितीत काळाबाजार आणि साठेबाजी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आवाहन मोदी यांनी राज्य सरकारांना केलं.

<><><><><>

केंद्र सरकारने केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे देशातल्या शेतकऱ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ झाल्याची माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी अंतर्गत शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपयांची आर्थिक मदत थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते, असंही चौहान म्हणाले.

दरम्यान, लोकसभेत आज वित्त विधेयक २०२६ वरची चर्चा पुढे सुरू होईल.

<><><><><>

सहकार क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी केंद्र सरकारने गेल्या पाच वर्षांत पाच लाख कोटी रुपये वितरित केले आहेत, अशी माहिती सहकार राज्यमंत्री कृष्ण पाल गुर्जर यांनी आज लोकसभेत पुरवणी प्रश्नांच्या उत्तरात दिली. ते म्हणाले की, राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाने १९६३ ते २०१४ या ५१ वर्षांच्या कालावधीत सहकार क्षेत्राला बळकट करण्यासाठी फक्त ५० हजार कोटी रुपये वितरित केले होते.

<><><><><>

एसटी महामंडळाच्या ताफ्यात राजमाता जिजाऊ श्रेणीच्या तीन हजार बसगाड्यांचं आज लोकार्पण करण्यात आलं. दोन बाय तीन आसन रचनेच्या या बसमधे ५६ जणआंची आसन व्यवस्था आहे. बस राज्याच्या कानाकोपऱ्यात नागरिकांना वाहतुक सेवा देईल, असं परिवहन मंत्री तथा एस टी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सांगितलं….

**होल्ड- बाईट- सरनाईक**

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या आंतराष्ट्रीय टी ट्वेंटी मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा निवड समितीने केली आहे. हरमनप्रितच्या नेतृत्वाखालच्या या संघात शफाली वर्मा, जेमीमा रॉड्रीग्ज, दिप्ती शर्मा आणि ऋचा घोष या अनुभवी खेळाडूंबरोबरच काश्वी गौतम, क्रिंता गौड आणि श्री चारणी या तरुण खेळाडूंचा समावेश आहे. रेणुका ठाकुर, अरुंधती रेड्डी आणि श्रेयंका पाटील या गोलंदाजांचाही या समावेश आहे. दक्षिण आफ्रिकेत १७ एप्रिलपासून ही मालिका सुरु होईल.

**//<><><><><>//**